दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२४ वा रविवार दि.२० ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## महाविकास आघाडीत विदर्भामधील जागांवरून तिढा कायम

मुंबई : विदर्भातील जागांवरून महाविकास आघाडीमध्ये अजूनही तिढा कायम आहे. विदर्भामध्ये आठ जागा मिळत असल्याने कमालीचा नाराज झालेल्या ठाकरे गटाने कोणत्याही परिस्थितीत १२ जागा मिळण्यासाठी आग्रह कायम ठेवला आहे. त्यामुळे जागावाटपाचा तिढा आता काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचला आहे. कोणत्याही परिस्थितीत वाटप झालेल्या जागांपेक्षा ठाकरे गटाला विदर्भामध्ये चार जागा अधिकच्या हव्या आहेत. त्यामुळे जागा वाटपाचा तिढा कायम आहे. विदर्भामध्ये ६२ विधानसभेच्या जागा आहेत, त्यापैकी ४६ जागा काँग्रेसकडे आठ जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि आठ जागा शिवसेना ठाकरे गटाला असे वाटप झाले आहे. मात्र विदर्भामध्ये १२ जागांवर ठाकरे आग्रही आहे. विदर्भातील रामटेक, कामठी, दक्षिण नागपुर,



वरोरा, आरमोरी, भंडारा, बुलढाणा, सिंदखेडराजा, आरणी, वर्धा, यवतमाळ, दिग्रज या जागांसाठी उद्धव ठाकरे गट आग्रही आहे. मात्र, विदर्भात काँग्रेसची ताकद जास्त असल्याने या जागा काँग्रेसला सोडाव्यात इतर ठिकाणी आम्ही कमी घ्यायला तयार असल्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. मात्र, विदर्भामध्ये १२ जागांपेक्षा आम्ही कमी जागा घेणार नसल्याची भूमिका उद्धव ठाकरे गटाकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यामध्ये वाद झाला होता. दरम्यान, या वादानंतर काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला तातडीने मुंबईत दाखल झाले. त्यांनी मातोश्रीर जात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेत चर्चा केली. रमेश चेन्नीथला यांनी महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून कोणत्याही वाद नसल्याचे म्हटले आहे. एक ते दोन दिवसांत जागांवरती चर्चा करून जागावाटप जाहीर केले जाईल, असेही रमेश चेन्नीथला यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की, मी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे, त्यांची प्रकृती ठीक नाही. मला एवढेच सांगायचे आहे की उद्धव ठाकरेही निरोगी आहेत आणि महाविकास आघाडीही निरोगी आहे. आमच्यात कोणत्याही प्रकारचा वाद नाही. जागावाटपाबाबत आज बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत नाना पटोले, संजय राऊत, जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली जागावाटपाबाबत बैठक होणार आहे. संजय राऊत म्हणाले की, रमेश चेन्नीथला मातोश्रीवर आले होते आणि उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आम्ही चर्चा केली. दोन दिवसांपासून रखडलेली चर्चा आज दुपारी पुन्हा सुरू होणार आहे. रात्री उशिरापर्यंत चर्चा पूर्ण करून जागावाटप निश्चित केले जाईल, असे आम्ही ठरवले आहे. समाजवादी पक्ष आमच्यासोबत असून शुक्रवारी उद्धव ठाकरे आणि अखिलेश यादव यांच्यात चर्चा झाली.

## अखेर राजेंद्र शिंगणे स्वगृही

पुणे : माजी मंत्री आणि अजित पवार गटाचे नेते डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी अखेर घरवापसी केली आहे. त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील उपस्थित होते. १९९२-९३ पासून आदरणीय पवार साहेबांबरोबर काम करत आहे. १९९५ मध्ये देखील अपक्ष आमदार म्हणून निवडून आल्यानंतर सातत्याने अनेक वर्ष साहेबांबरोबर काम केल्याचे शिंगणे म्हणाले. राजकारण-समाजकारणात केवळ पवारसाहेबांमुळे मोठे होण्याची संधी प्राप्त झाल्याचे शिंगणे म्हणाले.



मधल्या काळात मी वर्षभर अजित दादांबरोबर होतो. पण वेळोवेळी मी सांगितलेला आहे की, जिल्हा बँकेच्या अनेक अडचणींमुळं मी अजित पवारांबरोबर होतो. सरकारकडून मदत मला मिळाली नसती तर बँक वाचवणे मला अवघड झाले असते असेही शिंगणे म्हणाले. म्हणून मी अजित दादांबरोबर राहण्याचा निर्णय घेतला. पण आज महाराष्ट्राला ख-या अर्थाने वाचवण्याची गरज आहे असे शिंगणे म्हणाले. राजकीय सामाजिक दृष्ट्या आणि अनेक इतर विषयांच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राला वाचवण्याची गरज आहे. आदरणीय पवार साहेबच हे काम करू शकतात यावर माझा पूर्णपणे विश्वास आहे असेही शिंगणे म्हणाले.

जे नेतृत्व काम देईल ते मी करेन : शिंगणे आज मी पक्षात वापस येतोय पक्षात प्रवेश करत नाही असे शिंगणे म्हणाले. पक्ष आणि नेतृत्व जे काही सिंदखेड राजा मतदारसंघात जी जबाबदारी देण्यात येईल ती मी स्वीकारेल. मला कोणत्याही प्रकारचा आश्वासन दिले नव्हते मी स्वत:हून त्या पक्षातून बाहेर पडलो होतो. पक्ष संघटना वाढविण्यासाठी जे नेतृत्व काम देईल ते मी करेन असेही शिंगणे म्हणाले. गायत्री शिंगणे यांच्याबाबत विचारले असता ते म्हणाले की, लोकशाहीत सर्वांना काम करण्याच्या आणि नेतृत्व करण्याचा अधिकार आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा.

## देशाच्या राजपत्रात वनामकृविच्या पाच पिक वाणांचा समावेश

परभणी / प्रतिनिधी केंद्रीय बियाणे अधिनियम १९६६ नुसार भारत सरकारने केंद्रीय बियाणे समितीच्या शिफारसीनुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५ पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला. याबाबत कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने अधिसुचना प्रसिध्द केली असुन राजपत्राचा नोंदणीकृत क्रमांक एसओ ४३८८ (अ) हा आहे. सदर पाच वाणात विद्यापीठ विकसित हरभ-याचा परभणी चना (बीडीएनजी २०१८-१६), सोयाबीनचा एमएयुएस-७३१, देशी कपासीचा, अमेरिकन कपासीचा आणि तीळाचा टीएलटी-१० या वाणांचा समावेश आहे. देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेश केल्यामुळे या वाणांचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत होवून शेतक-यांची आर्थिक उन्नत्ती साधता येईल असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले. त्यांनी हे वाण विकसित करण्यास योगदान देणारे मुख्य शास्त्रज्ञ डॉ खिजर बेग, डॉ. व्ही. एन. चिंचाने, डॉ डि. के. पाटील, डॉ एस. पी. मेहत्रे, डॉ.व्ही. के. गीते, डॉ.मोहन धुप्पे आदीसह सर्व संबंधित शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. या वाणातील हरभरा, अमेरिकन कापूस आणि तीळाच्या वाणास महाराष्ट्र राज्याकरिता लागवडीकरिता प्रसारण करण्याची मान्यता देण्यात आली आहे तर सोयाबीनच्या वाणास महाराष्ट्रातील मराठवाडा क्षेत्रासाठी लागवडीकरिता मान्यता मिळाली आणि देशी कपासीचा वाणास दक्षिण भारतातील आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्याकरिता लागवडीस मान्यता प्राप्त झाली. देशाच्या राजपत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिक वाणांचा समावेशामुळे सदरील वाणांचे बीजोत्पादन हे मुख्य बीजोत्पादन साखळीमध्ये घेता येणार असल्याची माहिती संशोधन संचालक तथा मुख्य शास्त्रज्ञ डॉ खिजर बेग यांनी दिली.

## अमित शाह-सीएम शिंदेंची बंद दाराआड चर्चा

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास २२ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून २९ ऑक्टोबर ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असणार आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीतील जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी वेगवान हालचाली सुरू असून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच दिल्लीत जाऊन भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा केली. दिल्लीतील या बैठकीनंतर सदर नेत्यांमध्ये चंदीगड इथेही एक बैठक पार पडली. मात्र चंदीगडमध्ये अमित शाह यांची राज्यातील तिन्ही नेत्यांसोबत बैठक झाल्यानंतर शाह यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत बंद दाराआड स्वतंत्र चर्चा केल्याचे समजते. विधानसभा निवडणुकीनंतर राज्याच्या मुख्यमंत्री नक्की कोणार होणार, याबाबत सर्वत्र उत्सुकता आहे.



महायुती म्हणून ही निवडणूक आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढू, मात्र मुख्यमंत्री कोण होणार, याचा निर्णय निवडणुकीनंतर आमचे केंद्रीय नेतृत्व घेईल अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मांडण्यात येत आहे. अशातच अमित शाह यांनी चंदीगड येथील बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत १५ ते २० मिनिटे स्वतंत्र चर्चा केल्याने त्यांना नेमके काय आश्वासन दिले, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेबाबतही भाजपचे केंद्रीय नेतृत्व समाधानी असल्याची माहिती आहे. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्र्यांच्या या प्रतिमेचा अधिकाधिक वापर महायुतीने करून घ्यावा, अशी भाजप नेतृत्वाची इच्छा असल्याचे बोलले जात आहे.

## उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची आमदार धिरज देशमुख यांनी घेतली भेट

लातूर/प्रतिनिधी :-कर्नाटकराज्याचे उपमुखयमंत्री, काँग्रेसचे नेते श्री. डी. के. शिवकुमार यांची बंगळुरू येथे त्यांच्या निवासस्थानी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शनिवारी, दि. १९ भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकांची सध्या जोरात तयारी सुरू आहे. यातून वेळ काढत आमदार धिरज देशमुख यांनी कर्नाटकचे उपमुख्यमंत्री श्री. डी. के. शिवकुमार यांची बंगळुरू येथे भेट घेतली. यावेळी कर्नाटक आणि महाराष्ट्रातील विविध विषयांवर त्यांनी चर्चा केली. या भेटीत महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांचीही उपमुख्यमंत्री श्री. डी. के. शिवकुमार यांनी माहिती घेतली.



## रणजीतसिंह मोहिते पाटीलांचा आमदारकीचा राजीनामा; लवकरच पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश?

मुंबई : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वाटेवर असलेले भाजपचे विधानपरिषद आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती आहे. रणजीतसिंह मोहिते पाटील हे माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असून त्यामुळेच त्यांनी विधानपरिषद आमदारकीचा राजीनामा दिल्याचे समजते. मात्र आमदारकीच्या राजीनाम्याबद्दल स्वत: रणजीतसिंह मोहिते पाटलांनी अद्याप अधिकृतरित्या माहिती दिलेली नाही.



लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील कुटुंबाने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला होता. ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढ्यातून लोकसभा निवडणूक लढवली आणि जिंकलीही. मात्र विजयसिंह मोहितेंचे पुत्र रणजीतसिंह मोहिते हे अद्यापही भाजपमध्येच होते असे असले तरी लोकसभा निवडणुकीपासून ते भाजपच्या व्यासपीठावर जाणं टाळत होते. त्यामुळे ते लवकरच भाजपला रामराम करतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. अखेर आता त्यांनी आपला राजकीय निर्णय घेत आमदारकीचा राजीनामा दिल्याची माहिती आहे.

माढा विधानसभेत तिकिटाचा तिढा माढा विधानसभा मतदारसंघातून शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून लढण्यासाठी तब्बल सहा नेते इच्छुक असल्याचे समजते. यामध्ये विद्यमान आमदार बबन शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे, रणजीतसिंह मोहिते पाटील, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, संजय कोकाटे, नितीन कापसे, संजय घाटनेकर पाटील यांचा समावेश आहे. यातील अभिजीत पाटील, संजय कोकाटे, नितीन कापसे, संजय घाटनेकर पाटील अशा चौघांनी आज शरद पवारांची भेट घेतली. आम्ही सर्व इच्छुक भेटल्यानंतर रणजीत शिंदे यांना आपण उमेदवारी देणार नसल्याचं शरद पवारांनी आम्हाला आश्वास्त केलं आहे, अशी माहिती या इच्छुकांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

## गणेश कुंडलवाडीकर यांची भा ज पा युवा मोर्चा नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाउपाध्यक्ष निवड.

.बिलोली / हानुमंत चंदनकर :- बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी शहरातील भाजपाचे युवा कार्यकर्ते श्री गणेश भाऊ गुरुपवार कुंडलवाडीकर यांची भा ज पा युवा मोर्चा नांदेड दक्षिण जिल्हाउपाध्यक्ष निवड करण्यात आली सदर निवड हि भाजपाचे वरिष्ठ सतीश गोविंद गोड मोतीवार भाजपा युवा मोर्चा दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष नांदेड हर्ष भाऊ कांबळे कुंडलवाडी कर भाजपा दक्षिण ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष नांदेड व पक्षश्रेष्ठीने केली आहे श्री गणेश भाऊ गुरूपवार हे गेल्या पंधरा वर्षांपासून भा ज पा चे काम करतात व त्यांच्यासोबत तरुणाची मोठी फळी आहे कुंडलवाडी शहर परिसरातील अनेक नागरिकांच्या सुखदु:खात सहभागी होत असतात त्यांच्या निवडी नंतर जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्यांच स्वागत व अभिनंदन केले जात आहे



## पवार साहेब, एकनिष्ठ कार्यकर्त्यांच काय? : गायत्री शिंगणे

सिंदखेड : सिंदखेडराजाचे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा पुनश्च शरद पवार गटात प्रवेश झाल्यानंतर त्यांची पुतणी असलेली गायत्री शिंगणे यांनी शरद पवारांना सवाल केला आहे. शरद पवार साहेब! निष्ठावंतांचं काय? असा सवाल करत गायत्री शिंगणे यांनी सिंदखेडराजा मतदार संघातून अपक्ष लढणारच असल्याचा दावाही केला आहे. कालच मी शरद पवार साहेबांची वाय बी सेंटर येथे भेट घेतली असता त्या ठिकाणी डॉक्टर शिंगणे यांचा शरद पवार गटात प्रवेश होणार असल्याचा कुठेही सुतवाच नव्हता. मात्र आज त्यांचा प्रवेश झालेला आहे. हरकत नाही मी सिंदखेडराजा मतदारसंघातून अपक्ष लढणारच असल्याची पहिली प्रतिक्रिया गायत्री शिंगणे यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. माजी मंत्री आणि अजित पवार गटाचे नेते डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी घरवापसी केली आहे. ते आज पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. याच मुद्यावरुन पुतणी गायत्री शिंगणे यांनी राजेंद्र शिंगणे यांच्यावर जोरदार टीका केली. साहेब तुम्हाला माफ करतील, पण तुम्ही ना घरच्यांशी एकनिष्ठ, ना जनतेशी असे म्हणत गायत्री शिंगणे यांनी राजेंद्र शिंगणेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तर दुसरीकडे सिंदखेड राजा मतदार



संघाचे आ. डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश झाल्याने सिंदखेड राजा येथे त्यांच्या कार्यकर्त्यांनी राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळासमोर फटाके फोडून जल्लोष केला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी मिठाई देखील वाटप केली. आगामी विधानसभा निवडणुकीत डॉ. राजेंद्र शिंगणे हे शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्याचा आता जवळ जवळ स्पष्ट झाले आहे

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# शरीफांची शराफत

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ भारताबद्दल पुन्हा चांगले बोलले आहेत. शरीफ मुळात उद्योजक आणि राजकारणी आहेत. उद्योजकांना व्यवहार कळतो, नफा-तोटा समजतो. तो शरीफ यांना चांगला समजत असल्यामुळे त्यांना भारताशी तणाव तेवढासा मान्य नसतो कारण त्यात अंतिमत: पाकिस्तानचाच तोटा असल्याचे त्यांचे मानणे आहे. त्यांच्या अथवा पाकिस्तानच्या दुर्दैवाने पाकिस्तानात लष्कराच्या बळावर बेटकुळ्या फुगवून सत्तेवर आलेल्या राजकारण्यांना ते समजत नाही. कारण लष्कर त्यांना ते समजू देत नाही किंवा त्यांनी ते समजून घ्यावे अशी लष्कराची इच्छा नसते. एरव्ही पाकिस्तानात बहुतांश काळ लष्करी राजवटच होती. आपण किती शक्तीशाली आहोत आणि पाकिस्तानचे कसे भाग्यविधाते आहोत हे वारंवार सिद्ध करण्यासाठी तेथील लष्करशाहांनी भारतविरोधी चादरच सतत अंथरली. त्यातून भारताचे आर्थिक आघाडीवर फारसे नुकसान झाले नाही. तथापि, पाकिस्तानला त्याचा जबर फटका बसला आणि आजही बसतो आहे. त्यातून हा देश चीन या खुनशी देशाच्या कच्छपी लागला. पाकिस्तानात झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेला अर्थात एससीओच्या बैठकीसाठी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर पाकिस्तानला जाऊन आले. नवाज शरीफ आता पाकिस्तानचे पंतप्रधान नाहीत, मात्र विद्यमान राजवटीवर शरीफ यांचा प्रभाव आहे. त्यांचे धाकटे बंधू शाहबाज हे पाकिस्तानचे पंतप्रधान आहेत आणि ते आघाडीचे सरकार चालवत आहेत. या पार्श्वभूमीवर नवाज यांनी काही विधान केले, तर ते भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसाठी महत्त्वाचे असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानात यायला हवे होते अशी टिप्पणी नवाज यांनी केली आहे. मागे मोदी यांनी अचानक कशी त्यांच्या कुटुंबाला भेट दिली होती याचीही आठवण त्यांनी करून दिली. जयशंकर यांच्या भेटीचे त्यांनी मनापासून स्वागत केले तसेच भारत आणि पाकिस्तानमधील बिघडत्या संबंधांसाठी माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर टीका केली. पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात इम्रान यांनी अनेक वेळा अनावश्यक टिप्पण्या केल्या. त्यामुळे कटुता निर्माण होत गेली. दोन्ही देशांनी परस्परांच्या नेत्यांबाबत अशा शब्दांचा उपयोग करणे तर दूरच, असा विचारही करायला नको, असे नवाज यांनी सांगितले. भारत आणि पाकिस्तानला जोडणारा क्रिकेट हा दुवा आहे. क्रिकेट आणि व्यापारही पुन्हा सुरू झाला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जयशंकर यांच्या भेटीमुळे नवाज विशेष उत्साही झाल्याचे दिसले. यामुळे दोन्ही देशांतील बर्फ वितळण्यास सुरुवात होईल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. नवाज शरीफ कोणी पत्रकार अथवा दोन्ही देशांतील राजकारणाचे विश्लेषक नाहीत. ते एक जबाबदार नेते आहेत आणि त्यांनी पाकिस्तानची धुरा तीन वेळा सांभाळली आहे. त्यामुळे विश्लेषकांपेक्षा त्यांना जास्त समजते, असे मानण्यास हरकत नाही. कारगिलच्या युद्धाच्या वेळीही तेच पाकिस्तानचे पंतप्रधान होते. तेव्हाच्या लष्करी नेतृत्वाने त्यांनाही अंधारात ठेवत भारतात घुसखोरी करण्याचे साहस केले असे म्हटले जाते. स्वत: शरीफ यांनीही हा गौप्यस्फोट केला आहे. त्यानंतर पाकिस्तानला कसा मार खावा लागला आणि भारताला रोखण्यासाठी अमेरिकेची कशी मनधरणी करावी लागली आदी बाबी मध्यंतरीच्या काळात समोर आल्या आहेत. तथापि, एक मात्र खरे की उद्योजक नवाज शरीफ यांना नफा तोटा समजत असल्यामुळे त्यांनी पाकिस्तानच्या लष्कराप्रमाणे अथवा लष्कराच्या प्याद्यांप्रमाणे उठवळ स्वरूपाचे राजकारण केले नाही. गेली ७० वर्षे आपली परस्परांशी लढण्यात गेली. पुढची सत्तर वर्षे आपल्याला अशीच घालवायची आहेत का, असा शरीफ यांचा सवाल आहे. शरीफ आता मायदेशी परतले आहेत. त्या अगोदर काही वर्षे त्यांना ब्रिटनमध्ये विजनवासात घालवावी लागली. त्यापूर्वी जेव्हा ते पंतप्रधान होते तेव्हाही त्यांनी पाकिस्तानातील कथित युद्धखोरांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे वाक्य ऐकवले होते. आपण आणखी किती काळ आपल्या मुलांच्या ताटातील अन्न काढून घेत तो पैसा शस्त्रे आणि दारूगोळा खरेदी करण्यासाठी खर्च करणार आहोत, असा सवाल त्यांनी तेव्हाही केला होता. त्यावेळी त्याचीही चर्चा झाली होती, मात्र भारत विरोधावरच ज्यांचे अस्तित्व आहे त्यांना शरीफ यांची ही शांततेची भाषाही संकटाची वाटू लागली होती. शरीफ आता पुन्हा भारतासोबत मैत्रीची आस लावून बसले असले अन् भारत त्यांना मनापासून प्रतिसाद देण्यास सज्ज झाला तरी पाकिस्तान आणि दोन्ही देशांच्या संबंधांत जी भली मोठी दरी निर्माण झाली आहे ती भरून कशी काढणार हा प्रश्नच आहे. भारताला रस्ते, समुद्र आणि आकाश अशा तीनही मार्गांनी घेरण्याचा चीनचा प्रयत्न लपून राहिलेला नाही. त्याकरताच गेल्या दशकभरात चीनने भारताच्या सर्व शेजार्यांना चारा टाकण्यास सुरुवात केली. त्यात पाकिस्तानही होता. चीनने पाकिस्तानात मोठी गुंतवणूक केली आहे. तथापि, या गुंतवणुकीत जे उभारले जाणार आहे ते चीनला थेट भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवर आणून उभे करणार आहे. त्यामुळे भारताचा त्याला विरोध आहे. जयशंकर यांनी एससीओच्या बैठकीतील आपल्या भाषणात त्याचाच उल्लेख केला आहे. खुद्द पाकिस्तानातही चीनच्या गुंतवणुकीला आणि चीनला विरोध वाढत चालला आहे. चीनच्या कर्जाच्या विळख्याची दाहकता ज्यांना समजली असे श्रीलंका, बांगलादेश आणि अगदी ताजे उदाहरण म्हणजे मालदीवही त्या देशाच्या पाशातून स्वत:ला सोडवून घेण्याचा प्रयत्न करत आहेत व पुन्हा भारतावर विश्वास व्यक्त करताना दिसत आहेत. पाकिस्तानचे तसे नाही. किंबहुना त्या देशाच्या लष्कराने ज्या प्रकारे चीनची सार्वकालीन मित्र अशी संभावना केली आहे तो मोसम बदलेपर्यंत पाकिस्तान भारताकडे पूर्वग्रह विरहित दृष्टीने पाहण्याची सूतराम शक्यता नाही. नवाज शरीफ यांची शराफत चांगली आहे, मात्र पाकिस्तानात सगळेच 'शरीफ' नाहीत.

# दलबदल करणाऱ्या उमेदवारांना योग्य जागा दाखविण्याची हिच वेळ.

सध्याच्या परिस्थितीत जवळपास सर्वच पक्षांची उमेदवारी जाहीर झालेली आहे व काही गोपनीय आहे.या उमेदवारीमध्ये काही उमेदवार पक्षांशी निष्ठा ठेवणारे तर काही उमेदवार आयात केलेले किंवा सत्तेच्या लालसेने किंवा ईडीच्या कारवाईच्या भितीने आयाराम -गयाराम असे अनेक उमेदवार सर्वच पक्षांमध्ये आपल्याला रिंगणात उतरल्याचे दिसतात. अशां उमेदवारांना पक्षांशी निष्ठा नाही ते उमेदवार राज्याच्या जनतेचे कसे काय भले करणार याचाही विचार राज्यातील मतदारांनी करायला हवा. आयाराम-गयाराम हे सत्ता लोभी असल्याने स्वतः च्या स्वार्थापोटी संपूर्ण नितिमत्तेवर पाणी फेरून सत्तेसाठी कोणत्याही पक्षांसमोर लोटांगण घालतांना दिसतात.सध्या विधानसभेच्या निवडणुकांसाठी राज्यात अनेक पक्षातील राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे दलबदल झाले आहेत.परंतु यासाठी ठोस कायदा नाही किंवा शिक्षाही नाही मनात येईल तेव्हा सत्तेसाठी पक्ष बदलविने हा राजकीय पुढाऱ्यांचा गोरखधंदा बनल्याचे दिसून येते. कारण काही कायदे राजकीय पुढारी आपल्या हिताचे बनवित असतात.ही लोकशाहीच्या दृष्टीने शोकांतिकाच म्हणावी लागेल.यामुळे सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधीवरून व राजकीय पुढाऱ्यांवरून हळूहळू विश्वास उडत असल्याचे दिसून येते.पक्ष बदलल्यानंतर त्याला सहा वर्षांसाठी पक्षातुन काढले जाते मग दुसरा पक्ष त्याला का घेतो? दुसऱ्या पक्षासाठी त्याची वर्तणूक कशी काय चांगली असेल?ही राजकीय पुढाऱ्यांची मनमानी नाही का? त्यामुळे पक्ष बदलल्या नंतर कोणत्याही पक्षाने त्या राजकीय पुढाऱ्यांना आपल्या पक्षात आश्रय द्यायला नको,जर दिला तर कोणतेही राजकीय पद किंवा लोकप्रतिनिधीत्व पद यापासून कोसो दूर ठेवायला हवे.परंतु पक्ष सोडलेल्या राजकीय पुढाऱ्यांना हे सर्वच संपत्तीच्या बळावर ताबडतोब मिळते त्यामुळे असे वाटते की यांच्यासाठी काहीही कायदे कानुण किंवा नियमावली नसल्याचे दिसून येते.राज्यात पक्ष बदलण्या मागचा मुख्य उद्देश म्हणजे त्यांच्या जवळ असलेली करोडो रुपयांची वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल संपत्ती असने ती वाचवण्यासाठी कोणत्याही सत्ताधारी पक्षात प्रवेश करणे किंवा केलेले घोटाळे बंद करण्यासाठी किंवा वाममार्गाने कमविलेल्या संपत्तीवर ईडी किंवा इतर कारवाई होवू नये या उद्देशाने राज्यात राजकीय पुढारी यापक्षातुन त्यापक्षात उंदरा सारख्या उड्या मारतांना दिसतात.तरीही स्वतःला आमदार -खासदार (लोकप्रतिनिधी- जनप्रतिनिधी) समजतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.राज्यात गेल्या काही वर्षांत असा एकही राजकीय पुढारी दिसला नाही की त्याने जनहितासाठी किंवा लोककल्याणासाठी पक्ष सोडला असावा. राजकीय पुढारी या पक्षातुन त्या पक्षात जातात तेव्हा त्यांना नीतिमत्ता,पक्षांचे नियम, पक्षासाठी घेतलेली शपथ, एकनिष्ठता, समाजाबद्दलची जागृकता,पक्षाबद्दल स्वाभिमान, पक्षाची नियमावली,पक्षाने आपल्याला दिलेले वैभव हे संपूर्ण एका क्षणात विसरतात. अशांना धडा शिकविण्याची हिच खरी वेळ मतदारांवर आहे. स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणारा पक्ष किंवा राजकीय वर्तुळात विरोधी पक्षावर ताशेरे ओढणारे राजकीय पुढारी अचानक सर्वच गोष्टी विसरतात हे कसे काय? कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) किंवा राजकीय पुढारी असो तो जेव्हा पक्ष बदलतो तेव्हा त्याला काहीच कसे काय वाटत नाही?ज्या पक्षाचे अनेक वर्षो नुवर्षे प्रतिनिधीत्व राजकीय पुढारी करतो तेव्हा तो विरोधकांवर तुटुन पडतो.अशा वेळेस लोकांना खरे वाटते व तो राजकीय पुढारी लोकांची मने जिंकतो.परंतु हाच राजकीय पुढारी ज्यांच्या विरोधात बोलतो त्यांच्याच पक्षात प्रवेश करतो तेव्हा याला काय म्हणावे? यावरून स्पष्ट होते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वार्थासाठीच राजकारण करीत असल्याचे दिसून येते ही बाब मतदारांनी लक्षात ठेवली पाहिजे. राजकीय पुढारी जेव्हा पक्ष बदलवितात तेव्हा सर्वसामान्यांच्या जिव्हारी लागते व मन दु:खावते.कारण राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे किंवा आमदार -खासदार यांनी सत्तेसाठी पक्ष बदलविने म्हणजे ज्या ताटात खाल्ले त्याच ताटाला छिद्र पाडने होय. महाराष्ट्रातील राजकारण पहाता राजकीय पुढाऱ्यांना असे वाटते की फक्त आपणच खूप हुशार आहोत व बाकी सर्व लोक अणपड-गवार आहेत असे वाटते. कारण गेल्या काही वर्षांपासून राज्यात राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे जनुकाय राजकीय भुकंप आला की काय असे वाटते.राजकीय उलथापालथमध्ये राज्याचा करोडो रुपयांचा चुराडा झाला.याचा सरळ परिणाम गरीब, सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना भोगावा लागतो आहे. करोडोचा भ्रष्टाचार राजकीय पुढारी करतील आणि त्याचे प्रायचित्य गरीब,सर्वसामान्यांनी व शेतकऱ्यांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा?कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय दृष्ट्या सर्वसामान्यांची किंमत झीरोबजेटमध्ये असल्याचे दिसून येते. यामुळे राजकीय पुढारी तुपाशी आणि सर्वसामान्य जनता उपाशी असल्याचे दिसून येते. राजकीय पुढारी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात व सत्तेसाठी हपहपल्यासारखे करतात व एकमेकांवर कुत्र्या-मांजरासारखे तुटुन पडतात. यात सर्वसामान्यांचा किंवा मतदारांचा तिळमात्र विचार केला जात नाही हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांत राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थापोटी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.कारण आमदारांना-खासदार यांना (लोकप्रतिनिधींना) जनता पाच वर्षांसाठी निवडून यासाठी देते की राज्याचा आणि देशाचा कारभार सुरळीत चालावा व विकास झपाट्याने व्हावा.परंतु राजकीय पुढारी राज्याचा किंवा सर्वसामान्यांचा विकास करण्यापेक्षा स्वतःच्या विकासावर जास्त भर देतांना दिसतात मग तो कोणत्याही पक्षाचा पुढारी असो.याचे जीवंत उदाहरण सर्वांसमोर आहे. राजकीय पुढारी निवडुण आल्यानंतर मतदारांना विसरतात हे जनतेला चांगलेच लक्षात आले. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात राजकीय पुढाऱ्यांनी जनुकाय तमाशा मांडला की काय असे चित्र सर्वांनीच पहाले.यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी जनतेच्या भावनांशी वाईट व घृणास्पद खेळ खेळतांना दिसतात.सत्ताधारी पक्षाने भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या पक्षातील राजकीय पुढाऱ्यांना सत्ताधारी पक्ष आपल्या सोबत घेतो हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.मग काय भ्रष्टाचारी राजकीय पुढारी जर सत्ते सोबत गेले म्हणजे शुद्ध होतात काय? असाही प्रश्न उपस्थित होतो.अशाप्रकारे असे अनेक प्रश्न उद्भवतात. यामुळे राजकीय दृष्ट्या राज्याची परिस्थितीत दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसते. याकरीता कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढारी आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) यांच्यावर लगाम कसने अत्यंत गरजेचे आहे. कारण राज्याच्या घडामोडी या लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. राजकीय पुढारी आपल्या स्वार्थापोटी पक्षांतर करतात व सत्तेत सहभागी होतात.याचा मनस्ताप लोकांमध्ये दिसून येतो. याकरीता पक्षांतर बंदी कायद्यात मोठ्या प्रमाणात सुधारणेची गरज आहे.कारण कोणताही पक्ष असो त्याला पक्षाबद्दल निष्ठा व आपुलकी असायलाच हवी.परंतु सध्याच्या परिस्थितीत सर्वच राजकीय पुढारी निष्ठा,पक्षाचे आचारविचार हे सर्व बाजुला सारुन सत्तेकडे धावतांना दिसतात.यामुळे कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवरने अत्यंत गरजेचे आहे. जोपर्यंत राजकीय पुढाऱ्यांवर पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा होत नाही तोपर्यंत असाच राजकीय लपंडाव सुरू राहील.त्यामुळे राजकीय पुढारी खुर्चीसाठी सर्वसामान्यांचा बळी घ्यायला सुध्दा मागेपुढे पाहत नाहीत,हे त्यांच्या पक्ष बदलण्याच्या प्रक्रियेत वरून स्पष्ट दिसून येते. परंतु मतदार बंधु-भगिनी दलबदल करणाऱ्या सर्वच उमेदवारांना त्यांची योग्य जागा दाखविण्याची हिच खरी संधी आहे.राज्यातील कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवार असो त्याने जर दलबदल केले असेल तर मतदारांनी कोणालाही मतदान करावे.परंतु दलबदल करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला अजीबात मतदान करु नये.कारण सत्तेसाठी तो पक्षाचा होवू शकत नाही,तर आपला किंवा आमजनतेचा काय होईल याचाही मतदारांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत दलबदल करणाऱ्या उमेदवारांचा मतदारांनी करेक्ट कार्यक्रम केला पाहिजे.जय हिंद!

***************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# अनुसूचित जाती-जमाती आयोगं,'बुजगावणे' ?

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या व्यापक धोरणात्मक मुद्यांवर आणि विकासाच्या स्तरांवर सरकारला सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील सल्लागार संस्था म्हणून आयोगाची स्थापना करण्यात आली आहे पण आयोगाने अनुसूचित जाती/जमाती यांच्या विकासाच्या स्तरांवर सरकारला दिलेले सल्ल्याचे पालन करणे बंधनकारक अज्ञिबात नाही प्रत्येक वर्षी हे आयोगं आपला अहवाल सादर करतात पण या अहवालावर संसदेत चर्चा केली जात नाही आणि अहवालावर चर्चा न करण्याचे कारणं ही दिली जात नाहीत म्हणून आयोगाच्या शिफारशी या सरकारवर बंधनकारक नाहीत असे म्हटले तर ते अतिशयोक्ती होणार नाही.

अनुसूचित जाती-जमाती यांना शिक्षणात आणि नौकऱ्यात सवलती जाहीर केल्या म्हणजे वंचित घटकांतील विविध जातीतील सर्व स्तरांतील समाज घटकांचा सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक समतोल विकास झाला असे समजले जात असले तरी हा विकास अनुसूचित जाती/जमाती समाजातील ग्रामीण खेड्यात राहत असलेल्या गरीब वर्गाकडे आयोगाने दुर्लक्ष केलेले आहे ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही.

या देशात अनुसूचित जाती/जमातीवर अन्याय होत असेल तर अनेकजन तक्रारी दाखल करतात आयोग अनुसूचित जाती/जमाती यांच्यावरील अन्याय दूर करून न्याय देतील अशी अपेक्षा व्यक्त करतात पण आयोग आपला तपास करण्यास अक्षम्य दिरंगाई करतात अनेक वेळा बरेच अर्ज निकलीच काढले जात नाहीत,कांहीच कार्यवाही केली जात नाही आणि एखादया प्रकरणात निर्णय खूप विलंब करतो. आयोग बहुतेक प्रकरणांमध्ये सरकारच्या भूमिकेचे समर्थन करतो आणि अनुसूचित जाती/जमातीच्या विरोधात निर्णय देऊन अन्याय ही केला जातो अश्यावेळी आयोगाच्या निर्मितीवर शंका निर्माण होत आहोत.

भारतीय संविधानात अंतर्भूत केले आहे म्हणून आयोगाचे वार्षिक प्रगती अहवाल राष्ट्रपतींकडे सादर केल्यानंतर संसदेत मांडले जातात आणि त्यावर चर्चा होत नाहीत म्हणजेच अनुसूचित जाती/जमाती आयोगाने शासनास दिलेल्या सल्ल्याची दखल घेतली जात नाही.संसदेत अनुसूचित जातींची-८४ खासदार प्रतिनिधित्व करतात तर अनुसूचित जमातीचे-४७ खासदार प्रतिनिधित्व करतात मात्र जाती-जमाती अहवाल वाचन आणि चर्चा झाली पाहिजे असा आग्रह का धरत नाहीत? अनुसूचित जाती जमातीच्या समाजाचे प्रतिनिधी समाजाचे प्रतिनिधित्व करत नसून राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतात हे एक सत्य आहे.

अनुसूचित जाती-जमातीसाठी राष्ट्रीय आयोग ही अनुसूचित जाती-जमातीचे सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक शोषणापासुन संरक्षण करण्यासाठी निर्माण केलेली एक घटनात्मक संस्था आहे.केंद्रस्तरीय आयोग राज्यस्तरीय आयोग अयोगांच्या विस्तारामुळे अंतर्गत गोंधळ निर्माण झाला असून, त्यामुळे अनुसूचित जातींशी संबंधित संस्थांची भूमिका व अधिकार स्पष्ट होत नाहीत.केंद्रीय आयोगाचे अध्यक्ष राष्ट्रपती निवडतात तर राज्य आयोगाचे अध्यक्ष राज्याचे राज्यपाल निवडतात. केंद्रातील आयोगाचे अध्यक्ष हे प्रथम राजकीय पक्षाचे हेतू साध्य करण्यासाठी नियुक्त केले जातात तसेच राज्य आयोगाचे अध्यक्ष हे पण राजकीय पक्षाचे हेतू साध्य करण्यासाठी नियुक्त केले जातात.अनुसूचित जाती-जमातींच्या शोषणापासून मुक्तीसाठी,विकास साध्य करण्यासाठी आयोगाचे अध्यक्ष निवडले जातात तर काहीं कांही राज्यात अध्यक्ष निडलेच जात नाहीत यावरून संविधाना प्रती मा.राज्यपाल आणि राजकीय पक्षाची भुमीका संविधान विरोधी असल्याचे स्पष्ट होते.भाजपा आणि काँग्रेस यांच्या शासन कार्यकाळात अनुसूचित जाती-जमाती आयोगं निव्वल संविधानातील बुजगावणे करून ठेवले आहेत हे सत्य लपून राहत नाहीत.

संविधानिक आयोग म्हटलं की,अशा संस्थांची स्वत:ची मजबूत आचारसंहिता आणि नैतिक कार्यपद्धती असायला हवी. त्याचबरोबर दृष्टिकोन हा सकारात्मक, सर्जनशील आणि समावेशक असायला हवा. शिवाय, गैरशिस्त, गैरव्यवहार, बाह्यहस्तक्षेप आणि भ्रष्टाचार याबाबत अतिशय कडक अनुशासन आणि योग्य व जलद कारवाईची तयारी असली पाहिजे. कार्याविषयीची पारदर्शकता जनतेच्या विश्वास संपादनासाठी अतिशय महत्त्वाची आहे. सध्याच्या स्पर्धात्मक राजकारणाच्या युगात सर्व राजकीय पक्ष अशा संस्था स्वत:च्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याविषयी सजगता बाळगावी तर लागेलच; पण काही वेळा देशहितासाठी अप्रिय निर्णयही घ्यावे लागतील.अशा निष्पक्ष कार्यपद्धतीनेच जनतेचा विश्वास वाढेल. देशातील संस्था मजबूत असतील, तरच लोकशाहीला अभिप्रेत असलेली समता, न्याय आणि स्वातंत्र्य ही मूल्ये टिकू शकतील. पण, त्या सरपटू लागल्या आणि स्वायत्तता विसरून, जनहित डावलून काम करु लागल्या तर सर्वसामान्यांना कोण वाली राहील? अर्थात, ही फक्त संस्थांचीच जबाबदारी नाही. त्यांचे पावित्र्य टिकवण्यासाठी राज्यकर्ते आणि प्रशासन यांनीही या संस्थांचा आदर करायला शिकले पाहिजे. प्रसारमाध्यमांनी ही समतोल, पण परखड असले पाहिजे आणि सामान्य नागरिकांनीही सतर्क व सजग राहिले पाहिजे. संस्थाच टिकल्या नाहीत तर देश कसा टिकेल, हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारण्याची आवश्यकता आहे.



स्वतंत्र्यानंतर अनुसूचित जाती जमाती आयोग यांच्या कार्यप्रणाली विषयी जनतेचे अनुभव चांगला नाही.राष्ट्रपतींचे नियंत्रण शंकास्पद आहे.संवैधानिक आयोगाचे अध्यक्ष पदाची शिफारस राजकीय पक्ष राष्ट्रपतीकडे करतात आणि अध्यक्षाच्या माध्यमातून राजकीय पक्ष आपल्या मर्जीप्रमाणे आयोगाचे कामकाज करून घेतात म्हणजे अनुसूचित जाती जमाती आयोगात बाह्यहस्तक्षेपातून कामकाज करून घेतात.आरक्षण विरोधी भाजपाने त्यांच्या कार्यकाळात अनुसूचित जाती जमाती कल्याणकारी योजनांच्या निधीला कात्री लावून या योजना बंद केल्यात जमा आहेत तरी अनुसूचित जाती जमाती आयोग मूग गिळून गप्प आहेत.आयोगाकडे कोणी सामूहिक तक्रार केली तर आयोग बहुदा तक्रारीची दखल घेत नाही.अक्षम्य विलंब करून प्रकरणाला वेगळे वळण देणे पसंद करतो हे खेदाने सांगावेसे वाटते.

अनुसूचित जाती-जमाती यांचा सामाजिक,शैक्षणिक विकास झाला आहे.तो नाकारता येणार नाही पण अनुसूचित जाती-जमाती यांच्या आर्थिक सबलीकरनावर आयोगाने कसल्याही प्रकारचे प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत नाहीत किंवा आर्थिक विकास न होऊ देण्यात काँग्रेस भाजपा हेच जबाबदार आहे कारण आयोगाचे अध्यक्ष पद याच दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते यांनी उपभोगलेली आहेत.

अनुसूचित जाती-जमाती यांच्या जमिनीचा प्रश्न सोडवण्यास आयोगाने विशेष मोहिमेने कामकाज करण्याची आवश्यकता होती पण संसदेतील चर्चा काँग्रेस-भाजपा यांनी टाळाटाळ केली त्या उलट वन आणि पर्यावरण कायदा करून सरकारी जमिनी वन विभागास बहाल करून अनुसूचित जाती-जमाती यांचे सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे नियमनुकूल न करण्याचे शासन निर्णय काडून वंचित घटकावर अन्याय झाला तरीही आयोगाने आकडेवारी जाहीर करण्या पलीकडे काहीच ठोस निर्णय घेतला नाही ही फसवी आकडेवारी कार्यकारी मंडळातील प्रशासक अधिकारी वर्गाने पुरवली स्वातंत्र्यानंतर किती जमीन अनुसूचित जाती जमातींना वाटप केली.कुळ कायद्याने,सिलिंग कायद्याने,वतनाने किती जमीन मिळाली? याबाबत सरकारकडेच आकडेवारी नाही पण तरीही अकड्याचा फुगवटा करून आयोगाला आकडेवारी दाखवली जाते हे सत्य लपून राहिले नाही.

अनुसूचित जाती-जमाती आयोग घटनेच्या कलम-३३८ अनव्ये तयार करण्यात आला असून शासनाच्या कोणत्याही आदेशाखाली उपबंधीत करण्यात आलेल्या संरक्षक तरतुदींच्या सर्व बाबीचे अन्वेषण व सनियंत्रण करणे आणि अनुसूचित जाती जमाती संरक्षक तरतुदींच्या कामकाजाचे मूल्यपापन करणे,अनुसूचित जाती-जमाती यांना अधिकारापासून आणि संरक्षक तरतुदीपासून वंचित केल्या संबंधिच्या तक्रारीच्या सुनावण्या घेऊन चौकशी करणे,अनुसूचित जातीच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे असे संविधातील उपकलमात नमूद असले तरी हे कामकाज अनुसूचित जाती-जमाती आयोग करतांना दिसून येत नाही हे संविधानानुसार कामकाज करण्यात येत नाही.

अनुसूचित जाती-जमाती आयोगाची निर्मिती फक्त अनुसूचित जाती-जमातिच्या संरक्षक तरतुदींच्या बाबीचे अन्वेषण व सनियंत्रण करणे आणि विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठीच करण्यात आले आहे.अनुसूचित जाती-जमातीच्या कल्याणकारी विकास करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाच्या प्रशासकवर्गाच्या खात्याचे सचिवावर व त्यांचे सहाय्यक अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.अनुसूचित जातींच्या-जमातींच्या अर्थसंकल्पातील कल्याणकारी निधी खर्च न करतात वंचित घटकांच्या विकास निधीतून सवर्ण विकास कामावर खर्च करतात,भ्रष्टाचार करतात त्यामुळेच अनुसूचित जाती-जमातीं विकासापासून कोसोदूर आहेत या बाबी अनुसूचित जाती आयोग यांना ही ज्ञात नाही.आयोगाला मूल्यमापना व्यतिरिक्त अधिकार खूप तोकडे आहेत.केंद्र सरकारच्या अर्थ संकल्पित निधी,राज्य सरकारचा अर्थसंकल्प निधी अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे वर्ग करून त्यांना कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून संसदेने तसे अधिकार बहाल करून निवडणूक अयोगासारखे अधिकार बहाल करून देणे गरजेचे आहे त्यासाठी निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन सारखा खमक्या आयुक्त आयोगावर बसवणे काळाची गरज आहे अन्यथा वंचित घटक यांचा शास्वत आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक विकास होणे शक्य नाही.

************

शब्दांकन,
एन.पी.सरवदे,बीड
९९७५४८४८८४

# करवा चौथचा उपवास करताय? काय खावं काय खाऊ नये हे कळत नाहीय? तज्ज्ञांकडून जाणून घ्या

करवा चौथ हा एक पारंपरिक हिंदू सण आहे, जो संपूर्ण भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो, विशेषतः उत्तरेकडील राज्यांमध्ये. या दिवशी महिलांद्वारे सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत उपवास केला जातो आणि विश्वास असा आहे की, यामुळे त्यांच्या पतीला दीर्घायुष्य लाभते आणि त्यांचे आरोग्य निरोगी होते. जर तुम्ही हा उपवास करण्याची तयारी करत असाल, तर हा उपवास निरोगी आणि आरोग्यदायी करण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स आज आपण जाणून घेणार आहोत.

तुम्ही कोणते पदार्थ खाऊ शकता? उपवासाआधी (प्री–फास्ट) प्रॅगमॅटिक न्यूट्रिशनच्या मुख्य पोषणतज्ज्ञ मीनू बालाजी यांनी उपवासाची मानसिक तयारी करण्यासाठी दीर्घ श्वासोच्छ्वास किंवा ध्यान यांसारख्या सजग क्रियाकलापांनी तुमचा दिवस सुरू करण्याची शिफारस केली आहे. तुमच्या दिनक्रमाची आधीच योजना करून ठेवा आणि करवा चौथच्या दिवशी ऊर्जा राखून ठेवण्यासाठी तुमची कामे आधीच ठरवा आणि मेहनतीची कामे टाळा. तुमचं रुटीन अगदी सरळ सोपं ठेवा, असं त्या म्हणाल्या.

बालाजी यांनी कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स, प्रोटीन आणि हेल्दी फॅट्स यांसारखे ऊर्जा देणारे पदार्थ खाण्याचा सल्ला दिला. पाच भिजवलेले बदाम, दोन खजूर, एक वाटी भाजी, ओट्स दलिया आणि एक ग्लास कमी लो–फॅट दूध वापरून पाहा. वैकल्पिकरित्या, ग्रीक योगर्टसह चिया सीड पुडिंग, ताज्या फळांचे तुकडे, नट्स आणि सुकामेवा असलेले पदार्थ यादरम्यान चांगले काम करतात, असं बालाजी म्हणाल्या. द क्लेफ्ट अँड क्रॅनिओफेशियल सेंटर आणि श्री बालाजी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, चेन्नई येथील नोंदणीकृत आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांनी सांगितले की, उपवास करण्यापूर्वी लोकांनी ऊर्जा मिळवण्यासाठी संतुलित आहाराचा पर्याय निवडला पाहिजे. टिकाऊ ऊर्जा मिळवण्यासाठी रोटी किंवा पोळी, प्रथिनेयुक्त पदार्थ जसे की जाड डाळ, पनीर किंवा दही यांना तुम्ही प्राधान्य देऊ



शकता. जेवणात बाजरीचाही समावेश केला जाऊ शकतो, असं त्या म्हणाल्या.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, उपवास करण्यापूर्वी हायड्रेटेड राहणे महत्त्वाचे आहे. दिवसभर डिहायड्रेशन टाळण्यासाठी नारळ पाणी, ताक किंवा साधे पाणी पिण्यावर भर द्या. उपवासानंतर (पोस्ट–फास्ट) एकदा उपवास संपला की, रीहायड्रेटिंग ही पहिली प्राथमिकता असते. साधे पाणी, नारळ पाणी किंवा लिंबू पाणी प्यावे, त्यानंतर हलके, पचायला सोपे जेवण घ्यावे. बालाजी यांनी पौष्टिक पदार्थांची भरपाई करण्यासाठी धान्य, प्रथिने आणि निरोगी फॅट्स यांचे संतुलित मिश्रण असलेले लहान भाग खाण्याचा सल्ला दिला; तर दीपलक्ष्मी यांनी मसूरचे सूप, खिचडी, दही किंवा पनीरसह रोटी, पपई आणि टरबूज यांसारख्या फळांसह डाळ असे पर्याय सुचवले.

कोणते पदार्थ टाळावेत? तुमचा उपवास सोडल्यानंतर साखरयुक्त, खारट किंवा मसालेदार पदार्थ टाळणे चांगले आहे; कारण ते आम्लपित्तसारख्या पाचन समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. चहा किंवा कॉफीसारखी कॅफिनयुक्त पेयेदेखील वगळली पाहिजेत, कारण ते शरीराला निर्जलीकरण करू शकतात. उकडलेले कॉर्न, भाजलेले मखना किंवा स्प्राउट्स चाट यांसारखे लाईट स्नॅक्स निवडा. मिठाईसाठी लो–फॅट खीर किंवा गूळ घालून बनवलेले खजूर आणि नट्स असलेले लाडू हे आरोग्यदायी पर्याय आहेत. शांत प्रभावासाठी नियमित चहाच्या जागी कॅमोमाइल चहाची शिफारस बालाजी या करतात.

## जेवताना पाणी पिणे खरंच फायदेशीर आहे? जाणून घ्या, पाणी प्यायल्याने पचनक्रियेवर कसा होतो परिणाम?



पचनाशी संबंधित अनेक समज आणि गैरसमज खूप लवकर पसरतात. असाच एक समज आहे की, जेवणाबरोबर किंवा त्यानंतर पाणी प्यायल्याने पोटातील सिड खूप पातळ होते, ज्यामुळे अन्न पचण्यास अवघड जाते आणि आपली पचनक्रिया बिघडते; याशिवाय पोटाच्या इतर समस्यासुद्धा वाढतात.

खरंतर पोटातील सिडचे काम हे पाण्याच्या सेवनाकडे दुर्लक्ष करून पचनाचे कार्य सुरळीत पार पाडणे आहे. शरीरात हायड्रेशनची (पाण्याची) योग्य मात्रा राखण्यासाठी पाणी पिणे आवश्यक आहे आणि पाणी हे पचनास अडथळा आणण्याऐवजी उलट मदत करू शकते. याविषयी द इंडियन एक्स्प्रेसनी नवी दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सचे इंटर्नल मेडिसिन तज्ज्ञ डॉ. राकेश गुप्ता यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती सांगितली आहे.

पोटात गॅस्ट्रिक सिड तयार होते. विशेषत: हायड्रोक्लोरिक सिड तयार होते, जे अन्न पचवण्यास, पचन क्रियेस फायदेशीर असलेले एन्झाइम सक्रिय करण्यास आणि पोटातील हानिकारक बॅक्टेरिया मारण्यास महत्त्वाची भूमिका बजावते. पोटातील आतील भाग हा अत्यंत सिडिक असतो, ज्याचा पीएच सहसा १.५ ते ३.५ पर्यंत असतो, जो पचनासाठी अत्यंत आवश्यक आहे. पोटातील सिड आणि पाणी पोट हा आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग आहे, जो आपण खाल्लेले अन्न आणि द्रव सामावून घेतो. जेव्हा तुम्ही एखादा पदार्थ खाता किंवा द्रव पिता, तेव्हा ते पदार्थ किंवा द्रव सामावून घेण्यासाठी पोटाचा आकार वाढतो. पण, जेव्हा तुम्ही पाणी पिता तेव्हा पोटामध्ये गेलेले पाणी द्रव व पदार्थ एकजीव करते. पोटाकडे सिडिक वातावरण राखण्याची उत्तम क्षमता आहे. अन्न हे पोटाला खूप जास्त गॅस्ट्रिक सिड तयार करण्यास प्रोत्साहन देते, ज्यामुळे पचनासाठी गरजेचे पीएच तयार करण्यास मदत होते. पाणी प्यायल्याने पोटातील पदार्थांचा आकार थोड्या वेळासाठी वाढू शकतो, पण गॅस्ट्रिक सिड शरीराच्या सर्व गरजा पूर्ण करते आणि पचनक्रिया सुरळीत ठेवते.

पचनक्रियेसाठी पाणी कसे फायदेशीर आहे?संपूर्ण आरोग्यासाठी हायड्रेशन ही अत्यंत आवश्यक बाब आहे. जेवण करण्यापूर्वी, दरम्यान आणि त्या नंतर पाणी पिणे अनेक प्रकारे अन्न पचनास मदत करू शकते. पाणी पोषक तत्वांचे विघटन करण्यास मदत करते आणि पोटातील एन्झाइमॅटिक प्रक्रियेस प्रोत्साहन देते. पाण्यामुळे पचनसंस्थेचे कार्य सुरळीत राहण्यास मदत होते, तसेच बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. पचनक्रियेनंतर संपूर्ण शरीरात पोषक द्रव्ये वाहून नेण्यास पाणी मदत करते. जेवणाबरोबर पाणी पिण्याचे काय फायदे आहेत? जेवणाबरोबर पाणी प्यायल्याने अन्न मऊ होते, जे पचायला सोपे जाते तसेच पाणी तुम्हाला पोट भरण्यास मदत करू शकते; ज्यामुळे तुम्ही खूप जास्त खाणे टाळू शकता आणि वजन नियंत्रणात ठेवू शकता. याशिवाय जेवणाबरोबर पाणी प्यायल्याने टाळू स्वच्छ राहते, ज्यामुळे तुम्ही खात असलेल्या पदार्थाची चव वाढते आणि तुम्ही जेवणाचा अधिक चांगला आनंद घेऊ शकता. जर तुम्हाला सतत पचनाशी संबंधित समस्या येत असतील तर तुमच्या जवळच्या तज्ज्ञांचा सल्ला घ्या. पाणी आणि पोटातील सिड यांच्यातील संबंध समजून घ्या, जेणेकरून तुम्ही तुमच्या आहाराच्या सवयींमध्ये आवश्यक बदल करू शकता.

## चेहऱ्यावरील मुरूम दूर करण्यासाठी कच्चा लसूण वापरणे फायदेशीर आहे का? वाचा तज्ज्ञांचे मत

सोशल मीडियावर एक नवा ट्रेंड खूप चर्चेत आला आहे, ज्यात ब्युटी इन्फ्लूएंसर्स आपल्या चेहऱ्यावर लसूण चोळताना दिसत आहे. त्यांच्या मते, चेहऱ्यावरील मुरूम साफ करण्यास, डाग कमी करण्यास आणि त्वचेचा रंग उजळण्यास लसूण खूप फायदेशीर ठरू शकतो. मुरूमांसाठी कच्चा लसूण हा शब्द आणि या संदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर ट्रेंड होत असून लोकांचे लक्ष वेधून घेत आहे, ज्यात अनेकांना याचा फायदादेखील झालेला आहे. लसूण बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि दाहक–विरोधी गुणधर्मांसाठी ओळखला जातो, परंतु त्याचा थेट त्वचेवर वापर करणे धोकादायक ठरू शकते. याबाबत योग्य माहिती मिळवण्यासाठी इंडियन एक्स्प्रेसने बोअरिंग आणि लेडी कर्झन हॉस्पिटलच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्वेता श्रीधर यांचा सल्ला घेतला. ज्यात त्या म्हणाल्या की, लसणाला त्याच्या औषधी गुणधर्मांमुळे फार पूर्वीपासून ओळखले जाते. त्याच्यात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ, दाहकविरोधी आणि अँटीऑक्सिडंट या गुणधर्मांमुळे चेहऱ्यावर लसूण चोळण्याचा ट्रेंड वाढला आहे. बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ लसणातील एलिसिनला प्रयोगशाळेच्या अभ्यासात एक प्रभावी बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ दर्शविला आहे. हे प्रोपिओनिबॅक्टेरियम मुरूमांविरुद्ध लढते, मुरूमांमध्ये गुंतलेले बॅक्टेरिया काढण्यास फायदेशीर ठरते.



दाहकविरोधी लसणामध्ये दाहकविरोधी प्रभावी संयुगेदेखील असतात, जे मुरूमांशी संबंधित लालसरपणा आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. अँटिऑक्सिडंट संरक्षण लसणातील अँटिऑक्सिडंट सामग्री पेशींना नुकसान करणाऱ्या मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करून निरोगी त्वचेसाठी योगदान देऊ शकते. डॉ. श्वेता श्रीधर सांगतात की, लसणाचा उपाय खूप आकर्षक वाटत असला तरीही तो वापरताना सावधगिरी बाळगणे महत्त्वाचे आहे. तुमच्या चेहऱ्यावर कच्चा लसूण चोळणे हा वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला मुरूमांचा उपचार नाही, जरी त्याचा अनेकांना फायदा होत असला तरीही. लसणाच्या दुष्परिणामांचा धोका फायद्यांपेक्षा जास्त आहे.

संवेदनशील त्वचेवर लसूण वापरण्याचा धोका डॉ. श्रीधर यांच्या म्हणण्यानुसार, कच्चा लसूण अत्यंत प्रभावी आहे, यामुळे त्वचेची जळजळ, लालसरपणा निर्माण होऊ शकतो. विशेषत: संवेदनशील त्वचा असलेल्यांसाठी याचा जास्त धोका निर्माण होतो. त्यात एंजाइम आणि सल्फर घटक असतात, ज्यामुळे त्वचेला त्रास होऊ शकतो. याव्यतिरिक्त काही व्यक्तींना लसणाची लर्जी असल्यास पुरळ, अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी आणि तीव्र खाज यांसह लर्जिक प्रतिक्रियांचा अनुभव येऊ शकतो, लसणाच्या बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असूनही, त्याच्या कठोर गुणधर्मामुळे त्वचेचा नैसर्गिक अडथळा विस्कळीत होऊ शकतो, संभाव्यत: जळजळ वाढू शकते आणि मुरूमांचा त्रास वाढू शकतो. त्वचेवर लिसिनचे सकारात्मक आणि नकारात्मक प्रभाव

सकारात्मक परिणाम लिसिनच्या बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ मुरूमांना कारणीभूत असलेल्या बॅक्टेरियाचा सामना करण्यास मदत करू शकतात आणि त्याची अँटीऑक्सिडंट क्रिया त्वचेला मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवू शकते. नकारात्मक प्रभाव लिसिन अस्वस्थता, जळजळ निर्माण करणारा असतो. हा त्वचेवर लावल्याने चेहरा कोरडा पडणे, सूज येणे अशा काही समस्या निर्माण होऊ शकतात. इतर नैसर्गिक उपाय चहाच्या झाडाचे तेल, सफरचंद सायडर व्हिनेगर आणि मध हे काही पर्याय आहेत, जे मुरूम दूर करण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. मात्र, सावधगिरीने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा वापर करणे गरजेचे आहे.

## उपवासामुळे मासिक पाळी अनियमित होऊ शकते? करवा चौथचा उपवास करताना घ्या ‘या’ गोष्टींची काळजी; वाचा तज्ज्ञांचा सल्ला

हिंदू धर्मामध्ये अनेक व्रतवैकल्ये केली जातात, ज्यातील काही व्रत महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी करतात. महाराष्ट्रात ज्येष्ठ महिन्यामध्ये वटपौर्णिमा साजरी केली जाते. त्याचप्रमाणे दिल्ली, पंजाब आणि उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान यांसारख्या काही राज्यांमध्ये करवा चौथचे व्रत केले जाते. हे व्रत विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी करतात. हा उपवास महिला अन्न किंवा पाण्याशिवाय करतात आणि रात्री चंद्र दिसल्यानंतर चंद्राची पूजा करून तो सोडतात. परंतु, जास्त वेळ उपवास करणे किंवा सततच्या उपवासांचा आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे.

फरिदाबादमधील क्लाउडनाईन ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या कन्सल्टंट ऑब्स्टेट्रिशियन आणि गायनॅकॉलॉजिस्ट डॉ. पूजा सी ठुकराल म्हणतात की, उपवास वाढवल्यास मासिक पाळी, चयापचय आणि तणावाच्या प्रतिक्रिया यांसारख्या गंभीर शारीरिक कार्यांचे नियमन करणाऱ्या अत्यावश्यक हार्मोन्समध्ये चढ–उतार होऊ शकतात. डॉ. ठुकराल यांच्या मते, इन्सुलिन हा प्राथमिक हार्मोनपैकी एक आहे, जो उपवासामुळे प्रभावित होतो. जर उपवास विस्तारित कालावधीसाठी चालू राहिल्यास एक नियमित सराव बनतो, शरीर तणाव हार्मोन कॉर्टिसॉल वाढवून प्रतिसाद देऊ शकते.

उच्च कोर्टिसोल पातळी इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉनसारख्या पुनरुत्पादक हार्मोन्समध्ये व्यत्यय आणतात, ज्यामुळे हार्मोनल असंतुलन होते. काही स्त्रियांसाठी याचा परिणाम मासिक पाळीत अनियमितता, मूड बदलणे किंवा सामान्य थकवा जाणवू शकतो. याव्यतिरिक्त, उपवासामुळे भूक आणि ऊर्जा नियंत्रित करण्यासाठी जबाबदार हार्मोन लेप्टिनचा स्तर कमी होऊ शकतो. जेव्हा लेप्टिनची पातळी कमी असते, तेव्हा शरीरातील ऊर्जा वाचवण्याचा सिग्नल म्हणून याचा अर्थ लावला जाऊ शकतो,



ज्यामुळे मासिक पाळी आणि प्रजननक्षमतेवर संभाव्य परिणाम होतो.

उपवासामुळे मासिक पाळीवर परिणाम होतो का? उपवास मासिक पाळीवर परिणाम करू शकतो, विशेषत: जेव्हा कॅलरीचे सेवन लक्षणीयरीत्या कमी होते किंवा जेव्हा उपवास दीर्घकाळ केला जातो. डॉ. ठुकराल सांगतात की, जेव्हा उपवासामुळे शरीरावर ताण येतो, तेव्हा ते पुनरुत्पादनापेक्षा जगण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यांना प्राधान्य देऊ शकते. यामुळे मासिक पाळी उशिरा येऊ शकते, ज्याला अमेनोरिया म्हणतात. तसेच काही स्त्रियांमध्ये हार्मोनल शिफ्टमुळे उपवास करताना मूड बदलणे, थकवा येणे आणि हार्मोनल असंतुलनाशी संबंधित इतर लक्षणेदेखील सामान्यपणे नोंदवली जातात. पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम सारख्या हार्मोनल असंतुलन असलेल्या स्त्रियांमध्ये उपवासामुळे ही लक्षणे वाढू शकतात, ज्यामुळे परिस्थिती व्यस्थित करणे अधिक कठीण होऊ शकते.

उपवास कसा करावा? उपवासाचे हार्मोनल आरोग्यावर होणारे संभाव्य नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी उपवास करताना काळजी घेणे आवश्यक आहे. डॉ. ठुकराल सांगतात की, स्त्रिया हायड्रेशनला प्राधान्य देतात आणि उपवास नसलेल्या वेळेत अनेक पदार्थ खातात. प्रथिने, निरोगी चरबी आणि फायबरने समृद्ध अन्न यांचे संतुलित मिश्रण रक्तातील साखरेची पातळी राखण्यास, संप्रेरकांचे संतुलन राखण्यास आणि तणाव दूर ठेवण्यास मदत करू शकते. चक्कर येणे, अतिरिक्त थकवा येणे किंवा हार्मोनल असंतुलनाची इतर लक्षणे आढळल्यास तुमच्या शरीराचे संकेत लक्षात घेऊन उपवास सोडणे महत्त्वाचे आहे.

उपवास कोणी टाळावा? उपवास सर्वच महिलांच्या आरोग्यासाठी योग्य असू शकत नाही. आजार असलेल्या किंवा उपवासामुळे अशक्तपणा जाणवणाऱ्या महिलांना जास्त पोषक पदार्थांची आवश्यकता असते. डॉ. ठुकराल यांनी सांगितले की, गर्भवती किंवा स्तनपान करणाऱ्या स्त्रियांना या अवस्थेत पौष्टिक गरज लक्षणीयरीत्या जास्त असते आणि उपवासामुळे आई आणि गर्भाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. उपवासामुळे अस्वास्थ्यकर वर्तन निर्माण होऊ शकते आणि मानसिक आरोग्याची स्थिती बिघडू शकते.

मासिक पाळीचे विकार असलेल्या स्त्रिया ज्यांना किंवा सारख्या समस्या आहेत त्यांनी उपवास टाळावा, कारण यामुळे पुढे संप्रेरक संतुलन बिघडू शकते. मधुमेह किंवा थायरॉईड विकारांसारख्या आरोग्य समस्या असलेल्या महिलांनी केवळ वैद्यकीय देखरेखीखालीच उपवास करावा, कारण यामुळे गंभीर आरोग्य धोके होऊ शकतात.

## रात्री ९.३० वाजता ध्यान करते अन् १० वाजता झोपते, समंथा रुथ प्रभुच्या दिनचर्येबाबत काय म्हणाले तज्ज्ञ?

दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हिला मायोसिटिस आजाराचे निदान झाले होते, पण आता उपचार घेतल्यानंतर ती या आजारातून बरे होण्याच्या मार्गावर आहे. मायोसिटिस ही एक स्वयंप्रतिकार स्थिती आहे. फॅमिली मॅन २फेम अभिनेत्री समंथाने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत आपल्या दिनचर्येचा खुलासा केला. व्हिडीओनुसार, समंथाचा दिवस सकाळी ६.३० वाजता सूर्यप्रकाशात सुरू होतो, त्यानंतर ती तेल वापरून तोंडाची स्वच्छता करते, , तेलाने मालिश करते आणि सकाळी ७ वाजता व्यायाम करते; ज्यात शरीराचे सामर्थ्य आणि वजन प्रशिक्षण यांचा समावेश असतो. काम सुरू करण्यापूर्वी ती देवासमोर प्रार्थना करते आणि कृतज्ञता व्यक्त करते. कामावर जाण्यापूर्वी ती रेड लाईट थेरपी मास्क वापरते आणि चेहरा बर्फाच्या पाण्यात बुडवून डोळ्यांची काळजी घेते. संध्याकाळी ६ वाजता पुन्हा रेड लाइट थेरपी घेते, त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता पिकलबॉल खेळते. रात्री ९.३० वाजता ध्यान करते आणि रात्री १० वाजता झोपते. हा व्हिडीओ पोस्ट करताना तिने, असे कॅप्शन दिले आहे. समंथाच्या दिनचर्येबाबत तज्ज्ञांचे मत काय आहे ते जाणून घेऊ या चांगल्या आरोग्यासाठी सक्रिय राहणे का आवश्यक आहे? याबाबत हैदराबादच्या लकडी पूल येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटल्समध्ये कार्यरत मुख्य आहारतज्ज्ञ डॉ. भावना पी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, शिस्तबद्ध जीवनशैली, नियमित व्यायाम आणि योग्य पोषण हे उत्तम आरोग्याचा पाया आहे. व्यायामात सातत्य राखणे महत्त्वाचे आहे. स्क्वॅट्स, डेडलिफ्ट्स आणि बेंच प्रेससारखे कंपाऊंड व्यायाम समाविष्ट करा, जे एकाच वेळी अनेक स्नायूंवर सक्रिय ठेवते आणि चयापचय वाढवतात. शरीरातील फॅट्स कमी करण्यासाठी आणि स्नायूंची मजबुती वाढविण्यासाठी हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी व्यायामदेखील महत्त्वपूर्ण आहे. हाय–इंटेन्सिटी इंटरव्हल ट्रेनिंग फॅट्स कमी करण्यात आणि स्नायू वस्तुमान टिकवून ठेवण्यासाठी विशेषतः प्रभावी ठरू शकते, असे डॉ. भावना यांनी सांगितले.

## हिमोग्लोबिनची पातळी सतत वाढल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतील? वाचा डॉक्टरांचे मत

कोणत्याही गोष्टीचे खूप जास्त प्रमाण किंवा कमी प्रमाण शरीरासाठी चांगले नसते. जसे की हिमोग्लोबिनची पातळी (पुरुषांसाठी पेक्षा कमी आणि स्त्रियांसाठी ) कमी असल्यास वैद्यकीय उपचारांची गरज भासते. त्याचप्रमाणे हिमोग्लोबिनची पातळी वाढणे हे देखील एक चिंतेचे कारण आहे. अशा प्रकारे जर तुमच्या शरीरात हिमोग्लोबिनची पातळी सातत्याने वाढत राहिली तर त्याचा शरीरावर नेमका काय परिणाम होतो पाहू

हिमोग्लोबिन म्हणजे काय? हिमोग्लोबिन हे लाल रक्तपेशींमधील प्रथिने आहे, जे संपूर्ण शरीरात ऑक्सिजन वाहून नेण्याचे काम करते. जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनची पातळी खूप जास्त असते (पुरुषांसाठी पेक्षा जास्त आणि स्त्रियांसाठी ) तेव्हा रक्त घट्ट होते आणि त्याची प्रवाहाची गती मंदावते; ज्यामुळे गुंतागूंत होण्याचा धोका वाढतो, अशी माहिती हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल हॉस्पिटल्सचे सल्लागार आणि क्रिटिकल केअर विभागाचे एचओडी डॉ. मनेंद्र यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना दिली. ते पुढे म्हणाले की, शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यामागे उंचीवर राहणे, दीर्घकाळ धूम्रपान करणे, निर्जलीकरण किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) सारखी काही कारणे आहेत, यामुळे शरीरात ऑक्सिजनचे सेवन मर्यादित होते. अधिक गंभीर प्रकरणांमध्ये म्हणजे पॉलीसिथेमिया वेरासारखा अस्थिमज्जा विकारामुळे शरीरात खूप जास्त लाल रक्तपेशी निर्माण होतात, हा एक दुर्मीळ रक्त रोग आहे, असेही डॉ. मनेंद्र म्हणाले.

शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यामागची कारणं हिमोग्लोबिनच्या पातळीत अचानक वाढ होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात. यात दिवसभर पाणी न पिणे या कारणाचादेखील समावेश आहे. अशा स्थितीत निर्जलीकरणासह शरीरात रक्ताचे प्रमाण कमी होऊ शकते. यावर मिरा रोडमधील वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे सल्लागार हेमॅटोलॉजिस्ट डॉ. मुरलीधरन सी म्हणाले की, हृदयविकार, फुफ्फुसाचे आजार आणि काही रक्त विकार असलेल्या व्यक्तींच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण जास्त असते. हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढल्यास शरीरावर काय परिणाम होतील?

# सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्यासोबत जाऊ अन्यथा नोटाला मतदान करू : संजयभाऊ कांबळे

लातूर : होऊ घातलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जे कोणी राजकीय पक्ष आम्हाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतील त्यांच्यासोबत आमचा समाज जाईल अन्यथा नोटाला मतदान करणार असल्याची माहिती भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.




समाजाच्या हितासाठी आणि विकासासाठी सत्ता मिळवा. अन्यथा आपले संविधानिक हक्क आणि अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करा,असा मरणोत्तर सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्यामुळे १९७२ साली ' माझा समाज माझं संघटन' हा नारा घेऊन भारतीय दलित पँथर उदयास आली. न्याय, हक्क आणि संरक्षणासाठी अविरत कार्य करून एकजुटीच्या माध्यमातून स्वाभिमान शिकवणाऱ्या दलित पँथरचा धसका संपूर्ण महाराष्ट्रासह अख्ख्या देशानेही घेतला होता. ती दलित पँथर १९९५ साली रिपब्लिकन ऐक्यामधेय सामील झाल्याने समाजाच्या प्रश्नावर एकजुटीने व ताकदीने लढताना आज कोणी दिसत नाही. सगळेच निवडणुकीच्या नादाला लागल्याने सामाजिक प्रश्न, ऐक्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आम्ही दलित पँथर पुनर्जीवित केल्याचे सांगून संजयभाऊ कांबळे म्हणाले की, त्या काळातील दलित पँथर एकजुटीच्या ताकदीवर लढली व वाढली. आता सुशिक्षितांना प्रशिक्षित करूनच संविधानिक मार्गाने संघर्ष करण्यासाठी कार्यकर्ता तयार केला जात आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये भारतीय दलित पँथरची ताकद खूप वाढली आहे. मात्र, निवडणूक लढवणे आमचा उद्देश नसल्यामुळे निवडणुकीला कोणी उमेदवार उभा राहणार नाही. परंतु उमेदवाराला निवडून आणण्याची क्षमता भारतीय दलित पँथर मध्ये आहे. महाराष्ट्रविधानसभेची तयारी जोरात सुरु आहे. आमचा आमच्या समाजावर विश्वास आहे. आम्ही सामाजिक न्याय, हक्कासाठी लढणारे आहोत. लोकशाहीत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदान कऱ्हे अत्यंत आवश्यक असते. आज आमच्या समाजाने कोणाला मतदान करावे ? हा प्रश्न आमच्यासमोर असल्याने जे कोणी आमच्या सामाजिक न्याय हक्कासाठी पुढे येऊन हमी देतील, त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय आम्ही सार्वमताने घेतला आहे. आमच्या प्रश्नासाठी कोणी पुढाकार घेत नसल्यास अथवा कार्यकर्त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देत नसल्यास आम्ही नोटांवर मतदान करणायचा निर्णय घेतला असल्याचे कांबळे यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी प्रा. बालाजी आचार्य, सुनील क्षीरसागर, धम्मानंद घोडके, सतीश मादळे, महेंद्र आचार्य, नारायण गायकवाड, संग्राम कदम, राजीव कांबळे, सतीश वाघमारे, गोविन्दन गायकवाड, हरिशचंद्र वाघमारे, अजय शृंगारे , रुपेश गायकवाड, माधव बनसोडे, बजरंग गायकवाड, सत्यवान जोगदंड, कैलास क्षीरसागर, विशाल कांबळे, उत्तम कांबळे, लहू शिंगे, राजकुमार घाडगे, धम्मपाल सावंत आदी उपस्थित होते.

## २० आक्टोबर रोजी अखिल भारतीय बौध्द महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

नवी मुंबई / के. एच. हनवते : दिनांक : २०/१०/२०२४ रोजी, सकाळी ११.०० वा., संस्थापिका-अध्यक्षा दिवंगत सुशिलाताई पटेकर यांच्या प्रमुख नेतृत्वातील,अखिल भारतीय बौध्द महासंघ, संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष पुजनिय भदंत-भन्ते डॉ. यशकाश्यपायन महास्थविर यांच्या अध्यक्षतेखाली, २५ (पंचवीस वी) वार्षिक सर्वसाधारण सभा, सारनाथ बुद्ध विहार, भानवज खोपोली, ता. खालापूर, जिल्हा रायगड, या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस प्रामुख्याने राष्ट्रीय महासचिव सन्माननीय व्हि.जे.गायकवाड साहेब यांच्या सहीत राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य पदाधिकारी तसेच विविध राज्यांतील व जिल्ह्यातील कार्यकर्ते पदाधिकारी, उपासक - उपासिका वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार असून राष्ट्रीय कार्यकारिणीची पुनर्रचना तसेच अध्यक्षांच्या परवानगीने इतर महत्वपूर्ण विषयांवर सुद्धा चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत. खोपोली शहर शाखेचे अध्यक्ष उदय गायकवाड साहेबांसह स्थानिक कार्यकर्ते पदाधिकारी, यांच्या नेतृत्वाखाली सदर आयोजित सभा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## पंजाबरावांचा नवीन अंदाज, मान्सूनचा मुक्काम लांबला, आजपासून इतके दिवस महाराष्ट्रातील 'त्या' जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस

रब्बी हंगामासाठी पूर्व मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आत्ताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. पंजाब रावांचा एक नवीन हवामान अंदाज समोर आला आहे.

जसं की आपणास ठाऊकच आहे की भारतीय हवामान खात्याने मान्सून महाराष्ट्रासहित देशातून माघारी फिरला असल्याचे जाहीर केले आहे.

तथापि भारतीय हवामान खात्याने राज्यात आगामी काही दिवस अवकाळी पाऊस पडणार असा अंदाज दिला आहे. यावर्षी दिवाळीपर्यंत स्थानिक वातावरण होऊन महाराष्ट्रात पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून समोर आला आहे.दुसरीकडे पंजाब रावांनी महाराष्ट्रातून मान्सून अजून माघारी फिरलेला नाही असे जाहीर केले असून राज्यात आगामी काही दिवस जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ७० व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, १९ ऑक्टोबर १८८२ ला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशनला शैक्षणिक क्षेत्रात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन सादर केले होते. या कृतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहेत. या कृतीच्या १४२ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २० आक्टोबर २०२४ ला दुपारी २:३० वाजता करण्यात आले आहे. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र येथे संपन्न होणार आहे. या कार्यशाळेला हायकोर्टाचे वकील मा. एड. पवन साळवे हे उद्घाटन करणार असून हायकोर्टाचे वकील मा. एड. राजू बागूल हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यायला हवे करिता ७० व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# एमडीए स्कूल ऑफ फार्मसी येथे विभागीय हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

लातूर/प्रतिनिधी: कोळपा येथील एमडीए स्कूल ऑफ फार्मसी येथे आयोजित सोलापूर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे अंतर्गत सोलापूर विभागीय हॉलीबॉल स्पर्धा (मुले व मुली ) एमडीए फाउंडेशनच्या शैक्षणिक संकुलात संपन्न होत आहे. स्पर्धेच्या उद्घाटनास विभागीय क्रीडा स्पर्धेचे सचिव प्रा.एस. एस.कोरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.स्पर्धेचे निरीक्षक डॉ. दरेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमास एमडीए फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियमबदा सारंगी,एमडीए शैक्षणिक संकुलाचे संचालक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य रवी कुऱ्हाडे हे उपस्थित होते.



या स्पर्धेत मुलांचे २१ व मुलींच्या ८ संघांनी सहभाग नोंदवला आहे.या स्पर्धेसाठी संघ मार्गदर्शक म्हणून प्रा.मंगेश पवार व व्यवस्थापक म्हणून प्रा. अक्षय बेनकी हे काम पाहत आहेत.प्रा.एस. टी. काळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमास शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वीज वाहिनी दुरुस्तीसाठी रविवारी पाणीपुरवठा बंद राहणार

लातूर/ प्रतिनिधी :- वीज वाहिनीची दुरुस्ती करण्यासाठी रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी दिवसभर पाणीपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

धनेगाव येथून लातूर शहराला पाणीपुरवठा केला जातो.यासाठी धनेगाव हेडवर्क्स येथील ३३ केव्ही एक्सप्रेस लाईन वरील दुरुस्ती काम करणेसाठी महावितरण मार्फत विद्युत पुरवठा बंद राहणार असल्यामूळे रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी शहरात पाणीपुरवठा बंद राहणार असून नागरिकांनी सहकार्य करावे,असे आवाहन मनपा पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# संस्थेची ध्येयधोरणे आणि उद्दिष्टे म्हणजे त्या संस्थेचा आरसा होय - राजेश घाडगे

मुंबई :- बौद्धजन पंचायत समितीची स्थापना २५ मे १९४१ ला खार येथे एका परिषदेत लाटवणकर यांच्या घरासमोरील पटांगणात झाली परंतु त्याआधी सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक संस्था निर्माण करून त्या यशस्वीपणे चालवल्या होत्या, जोपासल्या, त्या सर्व संघटना आज स्तुत्य उपक्रम राबवून अनेक कामे करीत आहेत ज्याचा समाजातील तळागाळातील लोकांना फायदा होत आहे, बौद्धजन पंचायत समिती त्यातील एक भाग असून सदर समितीला आज जवळपास ८२ वर्षांचा प्रदीर्घ कालखंड झालेला आहे आणि आजही ही संस्था आपल्या दीड हजार शाखांसह एकसंघ पध्दतीने कार्यरत आहे. या संस्थेच्या पंधराहून अधिक उपसमित्या असून सर्वच शाखा, उपसमित्या पारदर्शक पद्धतीने कारभार करीत आहेत, त्यातील बौद्धजन पंचायत समितीचे काळीज म्हणजे शिक्षण समिती, या समितीच्या माध्यमातून आपण अनेक विद्यार्थ्यांना घडवतो, त्यांना शिक्षण घेण्यास मदत करतो त्याचप्रमाणे अर्थ समिती, न्यायदान समिती, विवाह समिती, संस्कार समिती अश्या अनेक समित्या, उपसमित्या आपण पंचायत समितीच्या माध्यमातून निर्माण करून माणसाला माणूस म्हणून घडवण्याचं, स्वतःच्या पायावर उभे राहण्याच उदात्त काम आपण करीत आहोत, बौद्धजन पंचायत समितीच्या एखाद्या शाखेचा कार्यकर्त्याला ही नगरसेवक पदाइतका सन्मान असतो, संस्थेचा कारभार शासकीय नियमानुसार काटेकोरपणे चालवला जात असून, संस्थेकडून सर्वच शासकीय नियमांचे पालन केले जाते, संस्थेचे अंदाजपत्रक शासकीय नियमानुसार काढले जाते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच भारतातील पहिलं स्मारक म्हणजे भैय्यासाहेब आंबेडकरांनी सन १९५८ साली उभारलेल बौद्धजन पंचायत समितीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह आज सदर सभागृहाचे बाबासाहेबांचे नातू व भैय्यासाहेबांचे सुपुत्र सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी सात मजली इमारतीत रूपांतर केले आहे, ज्यात दोन एअरकंडिशन हॉल असून विद्यार्थी, महिलांच्या विकासाकरता अनेक उपक्रम प्रत्येक दालनात राबविण्यात येणार आहे. सदर संस्थेची ध्येयधोरणे आणि उद्दिष्टे म्हणजेच आपल्या बौद्धजन पंचायत समितीचा आरसा होय, हाच आरसा डोळ्यासमोर ठेवूनच ही संस्था कार्यभार चालवत आहे असे प्रतिपादन बौद्धजन पंचायत समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे यांनी आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या तीन महिन्यांच्या कालावधीत होणाऱ्या वर्षावास प्रवचन




मालिकेच्या सांगता समारंभ बोलत असता केले. बौद्धजन पंचायत समिती व संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या तीन महिन्यांच्या कालावधीत वर्षावास प्रवचन मालिका संस्कार समिती अध्यक्ष मंगेश पवार आणि चिटणीस मनोहर बा. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली जाते सदर प्रवचन मालिकेचा सांगता समारंभ कार्यक्रम बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती विनोद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी मनोहर बा. मोरे यांनी अत्यंत लाघवी शैलीत सूत्रसंचालन केले तर मंगेश पवार यांनी प्रास्ताविक सादर केले, धार्मिक विधी मंगेश पवार गुरुजी, मनोहर बा. मोरे गुरुजी व त्यांच्या उपासक, उपासिकांनी सुमधुर वाणीने पार पाडला तद्नंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले, सदर प्रवचन मालिकेच्या निमित्ताने आयोजित श्रामणेर शिबिराकरता तसेच वर्षावास कार्यक्रमात ज्यांनी श्रमदान, भोजनदान, धम्मदान स्वरूपातील सेवा केली त्या सर्वांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर प्रसंगी उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, चंद्रमणी तांबे, पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर मोरे, कोषाध्यक्ष नागसेन गमरे, चिटणीस विठ्ठलराव जाधव, श्रीधर साळवी, लवेश तांबे, यशवंत कदम, अरुण जाधव, रवींद्र शिंदे, महेंद्र पवार, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, सुरेश मंचेकर, गजानन तांबे, महिला मंडळाच्या सुशीलाताई जाधव, अंजलीताई मोहिते, महिला मंडळ, विश्वस्त मंडळ, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात विनोद मोरे यांनी संस्कार समितीने बौद्धाचार्य, बौद्धाचार्यांना प्रथमच व्याख्याते म्हणून व्याख्यान देण्यास मंच उपलब्ध करून दिला, त्यामुळे येणाऱ्या काळात अनेक चांगले वक्ते निर्माण होऊ शकतात त्याबद्दल त्यांचे कौतुक केले त्याचबरोबर बौद्धजन पंचायत समितीच्या ज्या ज्या उपसमित्या सर्व नियमांचे पालन करीत उत्तम काम करत आहे त्यांचे कौतुक केले व ध्येयधोरणे व उद्दिष्टांना अनुसरून पुढील वाटचाल करावी आजवर आपण पारदर्शक पद्धतीने कारभार केला असेच पुढेही करत राहावे, समितीचे काम आजवर आपण इथवर आणले आहे ते पुढेही असेच सुरू ठेवावे असे सूचित करून सर्वांना मंगलकामना व सदिच्छा दिल्या, सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)च्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी भगवंत वायबसे यांची निवड




केज/प्रतिनिधी :- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)च्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी कासारी चे भूमिपुत्र भगवंत (अप्पा) अशोक वायबसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या हस्ते व महाराष्ट्र राज्याच्या महिला प्रदेशाध्यक्ष सुनिताताई चव्हाण, राज्य कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार आदींच्या हस्ते भगवंत वायबसे यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. यापूर्वी चळवळीत सक्रिय राहुन त्यांनी काम केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्न यासाठी आंदोलन उपोषण अशा विविध मार्गाने सामान्यांच्या प्रश्नासाठी ते झगडत असतात याची दखल घेऊन त्यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे यापुढे रिपब्लिकन चळवळ वाढवण्यासाठी काम करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवड बैठकीस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसील कार्यालयाच्या परिसरात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम

केज/प्रतिनिधी :- केज तहसील कार्यालयाच्या परिसरात केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, साने गुरुजी निवासी विद्यालय केज यांच्या वतीने गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२४-२५ अंतर्गत केज तहसील कार्यालय परिसरात दिनांक १८ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी गावस्वच्छता अभियाना



अंतर्गत जय भवानी चौक ते शहरातील मेन रोडवरुन स्वच्छता प्रभात फेरी काढून स्वच्छतेचा संदेश देणारे फलक घेऊन स्वच्छते विषयी जनजागृती करण्यात आली. सदर अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालय परिसर झाडून कचरा गोळा करून अनावश्यक झाडे झुडपे उपटून कचऱ्याची विल्हेवाट लाऊन तहसील कार्यालयाचा परिसर स्वच्छ करण्याचा संदेश सदर अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना साने गुरुजी निवासी विद्यालय यांच्या विद्यार्थ्यांनी दिला आहे. स्वच्छता मोहीम या स्तुत्य उपक्रमा विषयी केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी शाळेचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले या प्रसंगी नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ गायकवाड, केज सज्जाचे तलाठी साहिल इनामदार यांच्यासह तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. साने गुरुजी निवासी विद्यालयाने राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE